रोजगार हमी योजनेवर न्यायालयीन निर्णयानुसार कार्यरत हजेरी सहाय्यकांच्या रु.७५०-९४० या असुधारित वेतनश्रेणीत सुधारणा करुन त्यांना ६ व्या वेतन आयोगानुसार वेतनबँड रु ४४४०-७४४० + रु.१३०० ग्रेड वेतन ही समकक्ष सुधारित वेतन संरचना अनुज्ञेय करणेबाबत...

## महाराष्ट्र शासन
## नियोजन विभाग
### शासन निर्णय क्रमांकः हसका-२०१५/प्र.क्र.५०/मग्रारो-३

१६ वा मजला, नविन प्रशासकीय भवन,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.
तारीख: ११ मार्च,२०१६

**वाचा :**

१) शासन निर्णय, नियोजन विभाग क्रमांकः हसका-११९२/प्र.क्र.१२०/रोहयो-३, दिनांक ०६.०५.१९९२
२) शासन निर्णय, नियोजन विभाग क्रमांकः हसका-११९२/प्र.क्र.१२०/रोहयो-३, दिनांक २२.०२.१९९३
३) शासन निर्णय, नियोजन विभाग क्रमांकः हसका-१३९४/प्र.क्र.१८५/रोहयो-३, दिनांक ०१.१२.१९९५
४) शासन निर्णय, नियोजन विभाग क्रमांकः हसका-१३९७/प्र.क्र.१३६/रोहयो-३, दिनांक २१.०४.१९९९
५) शासन परिपत्रक, नियोजन विभाग क्रमांकः रोहयो-२००८/प्र.क्र.१०२/रोहयो-३, दिनांक १५.०४.२००९

**प्रस्तावना :**

रोजगार हमी योजनेच्या कामावर (सा. बां./ज.वि.) मजूरी मांडण्याकरिता मजूरामधून एक शिक्षित मजूर ७ वी पास यांची नियुक्ती हजेरी सहाय्यक म्हणून करण्याचा निर्णय शासनाने दिनांक १५.०२.१९७८ रोजी घेतला. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी मूळ अर्ज क्रमांक ६१०/९१ मध्ये दिनांक २४.०९.१९९१ रोजी दिलेल्या अंतरीम निर्णयानुसार शासनाच्या दिनांक ६.५.१९९२ च्या शासन निर्णयान्वये दिनांक १.१०.१९९१ पासून हजेरी सहाय्यकांना रु.७५०-१२-८७०-द.रो.-१४-९४० वेतनश्रेणी देण्यात आली. तद्नंतर महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने दिलेल्या आदेशानुसार शासनाच्या दिनांक २२.०२.१९९३ च्या शासन निर्णयान्वये हजेरी सहाय्यकांना दिनांक १.१०.१९८८ पासून शासन व जिल्हा परिषदेच्या गट-ड ची समकक्ष वेतनश्रेणी रु.७५०-९४० मंजूर करण्यात आली.

जे हजेरी सहाय्यक दिनांक २६.५.१९९३ ते दिनांक ३१.५.१९९३ या कालावधीत रोजगार हमी योजनेवर प्रत्यक्षात कार्यरत होते त्यांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार गट- क व गट-ड च्या पदावर सामावून घेण्याचा निर्णय शासनाने दिनांक १.१२.१९९५ व दिनांक २१.४.१९९९ च्या शासन निर्णयान्वये घेतला. दिनांक १५.४.२००९ च्या शासन परिपत्रकान्वये असे स्पष्ट करण्यात आले की, समावेशनापूर्वी हजेरी सहाय्यक पदावर करण्यात आलेली सेवा, शासकीय नियमित सेवा नसल्याने ती निवृत्तीवेतनार्ह सेवा ठरत नाही. जे हजेरी सहाय्यक दिनांक २६.५.१९९३ ते दिनांक ३१.५.१९९३ या कालावधीत रोजगार हमी योजनेच्या कामावर कार्यरत नव्हते त्यांना हजेरी सहाय्यक पदावरुन काढून न टाकता सेवानिवृत्त होईपर्यंत सध्याच्या पदावर कार्यरत ठेवण्यात येईल, असा निर्णय घेण्यात आला. सध्या राज्यात न्यायनिर्णयानुसार कार्यरत असलेल्या (दिनांक २६.५.१९९३ ते दिनांक ३१.५.१९९३ या कालावधीत कार्यरत नसलेले) हजेरी सहाय्यकांना रु.७५०-१२-८७०-द.रो.-१४-९४० या असुधारित वेतनश्रेणीत वेतन देण्यात येत आहे. याव्यतिरिक्त त्यांना अन्य कोणतेही फायदे देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे हजेरी सहाय्यक संघटना, महाराष्ट्र यांनी त्यांना रु.७५०-१२-८७०-द.रो.-१४-९४० या असुधारित वेतनश्रेणीत मिळणारे वेतन अतिशय तुटपुंजे असल्याने ६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी मिळण्याची विनंती केली आहे. हजेरी सहाय्यक संघटना, महाराष्ट्र यांनी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने सध्या राज्यात न्याय निर्णयानुसार रु.७५०-१२-८७०-द.रो.-१४-९४० या असुधारित वेतनश्रेणीत कार्यरत असलेल्या हजेरी सहाय्यकांना ६ व्या वेतन आयोगानुसार समकक्ष सुधारित वेतन संरचना अनुज्ञेय करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय :

सध्या राज्यात न्याय निर्णयानुसार रु.७५०-९४० या असुधारित वेतनश्रेणीत कार्यरत असलेल्या हजेरी सहाय्यकांना ६ व्या वेतन आयोगानुसार रु.४४४०-७४४०+ रु.१३०० ग्रेड वेतन ही समकक्ष सुधारित वेतन संरचना दिनांक १.१.२००६ पासून अनुज्ञेय करण्यास पुढील अटींच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे :-

१) सध्या न्यायनिर्णयानुसार कार्यरत असलेल्या हजेरी सहाय्यकांना या आदेशाच्या दिनांकापासून वेतनबँड रु. ४४४० - ७४४० + रु. १३०० ग्रेड वेतन ही समकक्ष सुधारित वेतन संरचना दिनांक १.१.२००६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने अनुज्ञेय करण्यात येत आहे. तथापि त्यांचे वेतन काल्पनिकरित्या निश्चित करुन सदर आदेशाच्या दिनांकापासून त्यांना प्रत्यक्ष फायदा अनुज्ञेय राहिल. दिनांक १.१.२००६ पासून सदर आदेशाच्या दिनांकापर्यंतच्या काल्पनिक वेतनवाढीचा कोणताही आर्थिक फायदा त्यांना अनुज्ञेय राहणार नाही. वित्त विभागाने वेतन संरचना सुधारीत करण्याबाबत दिलेल्या सूचनांनुसार, न्यायनिर्णयानुसार कार्यरत हजेरी सहाय्यकांचे, सुधारीत वेतन निश्चित करण्यात यावे.

२) रोजगार हमी योजनेवर न्याय निर्णयानुसार कार्यरत हजेरी सहाय्यकांना सदरची वेतनश्रेणी फक्त सेवानिवृत्ती पर्यंत देण्यात येणार असून, सेवानिवृत्ती नंतर सेवानिवृत्ती वेतन अथवा तत्सम फायदे देण्यात येणार नाहीत.

३) जे हजेरी सहाय्यक सदर आदेशाच्या दिनांकापूर्वी हजेरी सहाय्यक पदावरुन सेवानिवृत्त झाले आहेत, त्यांना सदरचा लाभ अनुज्ञेय नाही.

४) यापूर्वी शासनाने हजेरी सहाय्यकांबाबत वेळोवेळी घेतलेल्या निर्णयामंध्ये या आदेशामुळे कोणताही बदल होणार नाही. सदर आदेशांतील तरतूदी यापुढेही कायम राहतील.

५) सदर खर्च मंजूर निधीतून भगविणे आवश्यक राहिल.

२. न्यायनिर्णयानुसार कार्यरत हजेरी सहाय्यकांच्या वेतन व भत्यांवरील खर्च मागणी क्रमांक “ओ-३ मुख्यशिर्ष-२५०५-ग्रामीण रोजगार - ६०- इतर कार्यक्रम - ००१- रोजगार हमी योजना- पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०१)(०१) रोजगार हमी योजना (२५०५ ००२२)(खर्चाचे उद्दिष्ट संकेतांक - ०२- मजूरी)” या लेखाशिर्षाखाली मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

३. हे आदेश, वित्त विभागाने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ४३२/२०१५/व्यय-८, दिनांक ३.११.२०१५ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०३१११७४१४८०७१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

Prashant Ramesh Pimpale

Digitally signed by Prashant Ramesh Pimpale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Prashant Ramesh Pimpale
Date: 2016.03.14 12:51:57 +05'30'

**( प्रशांत र. पिंपळे )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.प्रति,**

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३. मा. मुख्य सचिव यांचे सहसचिव.
४. मा. मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव.
५. मा. मंत्री (रोहयो) यांचे खाजगी सचिव.
६. अ. मु. स. (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. अ. मु.स. (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्र. स. (वि.सु.), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. सचिव (रोहयो) , जलसंधारण व रोहयो विभाग, मुंबई.
१०. सचिव (लेखा व कोषागारे), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. सर्व विभागीय आयुक्त.
१२. सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक, मगांराग्रारोहयो (मुंबई व मुंबई उपनगरे वगळून).
१३. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक, मगांराग्रारोहयो.
१४. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
१५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१६. सर्व कोषागार अधिकारी.
१७. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
१८. प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा) महाराष्ट्र § १/२, मुंबई/नागपूर.
१९. सर्व सह सचिव/ उप सचिव, नियोजन विभाग (रोहयो), मंत्रालय, मुंबई.
२०. निवड नस्ती, मग्रारो - ३.